झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/६५५/२०२२
दिनांक :- २९/०६/२०२२.

## "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चेकलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त **अधिनियम**" असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर झालेला आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व एकूण झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रापैकी १३१३०.७५ चौ.मी.क्षेत्र घोषित आहे.सदरच्या १३१३०.७५ चौ.मी.क्षेत्राकरीता यापुर्वीच दि.०२/०२/२०१९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषितकरणेची पुर्वसूचना प्रसिद्ध करणेत आलेली होती व सदरची नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र फेब्रुवारी १४-२०, २०१९, पान नं.३९ मध्ये तसेच दैनिक दायित्व व लोकसत्ता या वृत्तपत्रात दि.१९/०२/२०१९ व दि.१६/०२/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापि, सदर पुर्वसुचनेमध्ये जमिनीच्या तपशीलामधील वर्णन, त्याच्या चतुर्सिमा तसेच एकूण झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रामध्ये चुका व तफावत आढळल्याने या संदर्भात सविस्तर फेरतपासणी करण्यात आली आहे. आता उपअभियंता तांत्रिक विभाग यांनी दि.२३/०६/२०२२ रोजी मोजणी नकाशान्वये प्रत्यक्ष योजनाक्षेत्राखाली येणारे एकूण २२८९०.९८ चौ.मी. + झोपडपट्टी व्याप्त खुल्या जागेचे (Open Space) येणारे क्षेत्र ३२३०.६८ चौ.मी. असे एकूण २६१२१.६६ चौ.मी. योजनेचे क्षेत्र या विभागास कळविले आहे. तसेच याकामी नगर भुमापन कार्यालयाकडील सदर मिळकतीच्या तपशिलांची माहिती घेऊन त्यानुसार योग्य ती नोंद घेण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त,झोनिपु विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांचा कार्यालयीन जा.क्र.झोनिपु/०४कावि/७७/२०२२, दि.०४/०५/२०२२ अन्वये झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीचा अहवाल प्राप्त आहे. तसेच,सक्षम प्राधिकारी क्र.३, झो.पु.प्रा., पुणे यांनी दि.२३/०६/२०२२ रोजी प्रत्यक्ष योजना क्षेत्रात स्थळपाहणी करुन त्यांचा झोपडपट्टी सदृश्य अहवाल प्रकरणी सादर केला आहे. म्हणून सदरचे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

**आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधीलतरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषितकरताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्धझाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषितकरील " असे नमूदकेले आहे.**

आणि ज्याअर्थी, या नोटीसाद्वारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्टक्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चेकलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे.

त्याअर्थी, या अनुसूचिमध्ये निर्दिष्टक्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकीहक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काहीसूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३ यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

**महानगरपालिकेचे नाव :-** पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**झोपडपट्टीचे नाव:-** स.नं.२०४, २०५, २०६ पै., सि.स.नं.४६९४, ४७४० पै, ४६९६ पै, ४७०५, ४७०६,४७०७, ४७१०पै, ४७११, ४७१२ पै, ४७१३ पै, ४७३९ पै, ४७१४पै, व ४७२३ पै.,इंदिरानगर,चिंचवड, पुणे

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमिनीचे मालकीहक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| इंदिरानगर, चिंचवड | स.नं.२०४,२०५,२०६पै, सि.स.नं.४६९४, ४७४०पै, ४६९६पै, ४७०५, ४७०६, ४७०७, ४७१०पै, ४७११, ४७१२पै,४७१३पै, ४७३९पै, ४७१४पै,व४७२३ पै.. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे व पिं.चि.मनपा | २६१२१.६६चौ.मी | **पुर्वेस** -स.नं.२०७ पै, सि.स.नं.४७२३.<br>**पश्चिमेस** - सि.स.नं.४६९३, सि.स.नं.४६९४ पै, सि.स.नं.४७४०.<br>**दक्षिणेस**-सि.स.नं.४७४४. सि.स.नं.४७४५ सि.स.नं.४७३७ सि.स.नं.४७३६<br>**उत्तरेस**-सि.स.नं.४६९५, सि.स.नं.४६९६, सि.स.नं.४७०८. सि.स.नं.४७०९. | |

सदरची नोटीसही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

29.6.2022

(राजेंद्र निंबाळकर) भा.प्र.से.
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :-२९/०६/२०२२.

प्रत- १.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
३. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांना माहितीस्तव.
४. मे.साईचंद्र एस.आर.ए.प्रोजेक्ट, प्रा.लि. स.नं.१०१/१६, उदयसोसा. एरंडवणा, पुणे-०४ यांना माहितीस्तव.